# रे.दि.मु.क्र.५२/२०१५ मधील नि.२४ वरील आदेश

(मारुती पाटील विरुध्द पदमावती जाधव वगैरे)

(१) दावा कलम १–ब मिळकतीमधुन प्रतिवादी यांनी नविन रस्ता करु नये व सदर मिळकतीतील वादीच्या शांततामय कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा करु नये. तसेच दावा कलम २ मध्ये नमुद केलेला रस्ता वादीस वापरण्याचा ठराव आहे असे जाहीर होऊन मिळणेसाठी वादीने प्रस्तुतचा दावा दाखल केला आहे. प्रतिवादीने वादीचा दावा नाकारला आहे व त्याचप्रमाणे वादीने गट नं.१३, १७, १८, १९ व २० मधुन जो रस्ता दाखवला आहे तोदेखील प्रतिवादींनी नाकारला आहे. वादींनी दावा कलम १–ब मिळकतीमध्ये रस्ता आहे किंवा नाही तसेच दावा कलम २ मधील वस्तुस्थिती अभिलेखावर येणेकरीता व दावा मिळकतीच्या हद्दीच्या खुणा कायम करण्याकरीता तालुका निरिक्षक भुमी अभिलेख, पलुस यांची नेमणुक होण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दिलेला आहे.

(२) प्रतिवादी यांनी वादी सदर अर्जाद्वारे पुरावा गोळा करु पाहात असल्याचे कथन करुन वादीचा अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

(३) वादीने त्यांच्या म्हणण्याच्या पुष्टयर्थ ***किसनलाल माणिकलाल राठी विरुध्द दिनकर यशवंत पाटील [२००४(१) एम.एच.एल.जे]*** मधील गुणोत्तराचा आधार घेतला आहे. सदर न्यायनिवाड्यामध्ये असे गुणोत्तर नमुद केले आहे की दावा मिळकतीच्या हद्दीबाबत वाद असल्यास तसेच एखाद्या जमिनीच्या स्थानबाबत वाद असल्यास त्या कामी कोर्ट कमीशनरची नेमणुक करता येते.

(४) प्रतिवादी यांनी ***निहाचलदास विरुध्द कविता करमचंदानी व इतर [२०१४(४) सीसीसी २९८ (राजस्थान)]*** मधील गुणोत्तराचा आधार घेतला आहे. सदर न्यायनिवाड्यामध्ये असे गुणोत्तर नमुद केले आहे की, दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २६ नियम ९ अन्वये पुरावा गोळा करण्यासाठी न्यायालयीन आयुक्ताची नेमणुक करता येणार नाही. प्रस्तुत कामी वादीच्या कथनानुसार दावा मिळकत १–ब मध्ये रस्ता नाही व असे असतानादेखील प्रतिवादी त्यात रस्ता तयार करणेबाबत प्रयत्न करीत आहेत. त्याकरीता त्यांनी तहसिलदार यांच्याकडे अर्ज दिलेला आहे. म्हणुन वादी यांनी प्रस्तुतचा दावा प्रतिवादी यांच्याविरुध्द मनाईकरीता दाखल केला आहे. तसेच दावा कलम २ मध्ये नमुद केलेला रस्ता वापरणेस प्रतिवादीनी हरकत अडथळा करु नये यासाठी देखील प्रस्तुतचा दावा दाखल केला आहे. मात्र प्रतिवादी यांनी दावा कलम २ मध्ये नमुद केलेला रस्ता अस्तित्वात नसल्याचे कथन केले आहे. प्रस्तुत अर्जाद्वारे वादी दावा कलम १ व दावा कलम २ मध्ये रस्ता आहे किंवा नाही ही बाब अभिलेखावर येण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दिलेला आहे. रस्त्याबाबतची वस्तुस्थिती न्यायालयीन आयुक्तामार्फत अभिलेखावर आणणे म्हणजे पुरावा गोळा करणे होणार नाही. परंत प्रस्तुत काम दावा हद्दी निश्चितीबाबत आहे त्यामुळे दावा मिळकतीच्या हद्दीच्या खुणा कायम करणेबाबत न्यायालयीन आयुक्तास आदेश करणे न्यायाचे होणार नाही. सबब प्रस्तुत कामी पुढील आदेश पारीत करीत आहे.

## **आदेश**

१. वादीचा अर्ज अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

२. उपअधिक्षक भुमी अभिलेख, पलुस यांची कोर्ट कमीशनर म्हणुन नेमणुक करण्यात येत आहे.

३. कोर्ट कमीशनर यांनी रि.स.नं.६ ची वस्तुस्थिती दर्शवणारा नकाशा म्हणजेच सदर मिळकतीमध्ये रस्ता आहे किंवा नाही व असल्यास तो कोठुन कोठे जातो याबाबत या मिळकतीच्या सरकारी अभिलेखाप्रमाणे उपलब्ध मुळ नकाशावरुन मोजणी करावी व सदर मोजणीचा अहवाल वस्तुस्थितीदर्शक नकाशासह याबाबत पत्र मिळाल्यापासुन तीन महिन्यात सादर करावा.

४. वादी यांनी कोर्ट कमीशनरची फी भरावी त्याचप्रमाणे कोर्ट कमीशनर यांना मोजणीकामी आवश्यक असणारी सर्व कागदपत्रे म्हणजेच दावा, प्रतिवादींची कैफियत, रि.स.नं.६ चा उतारा व प्रस्तुत आदेशाची प्रत सत्वर द्यावी.

५. वादी यांनी वर नमुद कागदपत्रांची पुर्तता आजपासुन २० दिवसांत करावी अन्यथा सदर आदेश रद्द समजणेत येईल.

६. वादी यांनी वर नमुदप्रमाणे कागदपत्रांची पुर्तता केल्यानंतर कमीशन पत्र जारी करावे.

सही/xx

पलुस. (एस.एस.पाटील)

दि.१५.१०.२०१५. सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, पलुस.